प्रति, दिनांक : .07.2019

मा. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री,

भारत सरकार, नवी देहली.

विषय : हिंदु धर्म–संस्कृती यांविषयी खोटी, अतिरंजित, द्वेष निर्माण करणारी माहिती प्रस्तुत करून ती विकृत स्वरूपात दाखवणाऱ्या आणि काल्पनिक निर्मिती असलेल्या 'लैला' या 'वेब सिरीज'वर बंदी घालण्याविषयी...

महोदय,

'प्रयाग अकबर' यांच्या 'लैला' या पुस्तकावर आधारित 'लैला' ही 'वेब टेलीव्हिजन सिरीज' काढण्यात आली असून त्याचे दिग्दर्शन चित्रपट निर्मात्या दीपा मेहता यांनी केले आहे. 'ओपन एअर फिल्म एलएलपी' (Open Air Films LLP) या कंपनीने तिची निर्मिती केली असून ही 'वेब टेलीव्हिजन सिरीज' दिनांक 14 जून 2019 पासून 'नेटफ्लिक्स' (Netflix) द्वारे सर्वत्र प्रसारित केली जात आहे. यात अभिनेत्री हुमा कुरैशीने त्यात काम केले आहे. यामध्ये 'वर्ष 2040 मध्ये भारतावर डॉ. जोशी नावाच्या एका हुकूमशहाचे राज्य असून तो 'आर्यावर्त' नावाची एक कडव्या विचारांची हिंदुत्वनिष्ठ संघटना चालवतो. या संघटनेला आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाह मान्य नसतात अन् तसे केल्यास त्याला अत्यंत कठोर शासन केले जाते', असे दाखवण्यात आले आहे. व्यक्तींचे होणारे शुद्धीकरण दाखवतांना नाझीने ज्याप्रकारे ज्यूंवर अत्याचार करतांना गॅस चेंबरचा वापर केला त्याप्रमाणे हिंदूंना राक्षसी महत्त्वाकांक्षा असलेले दाखवण्यात आले आहे.

**⁕ तरी या संदर्भात आणखी काही गोष्टी आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो**

1. 'लैला' नावाच्या 'वेब टेलीव्हिजन सिरीज'मध्ये 'भारतात डॉ. जोशी नावाच्या एका व्यक्तीचे पूर्ण देशावर राज्य असून संपूर्ण देश जाती आणि धर्म यांवर विभागलेला आहे. शालीन पाठक ही हिंदू महिला रिजवान चौधरी या मुस्लीम माणसाशी विवाह करते. हा विवाह आर्यवर्तला मान्य नसल्याने तिची मुलगी लैला तिच्यापासून काढून घेण्यात येते आणि तिचा घेण्यात येणारा शोध', असे दाखवण्यात आले आहे.

2. तसेच या 'वेब टेलीव्हिजन सिरीज'मध्ये 'धर्मांतर करणाऱ्या माणसाला शिक्षा म्हणून सुधारगृहात ठेवण्यात येते. जे सुधारगृह छळछावणी स्वरूपात दाखवण्यात आले आहे. या शुद्धीकरण्याच्या प्रक्रियेत महिलांनी उष्टावलेल्या प्रसादावरून लोटांगण घालत पुढे जाणे', 'महिलेचा कुत्र्यासमवेत विवाह', असे भयंकर आणि जाणीवपूर्वक हिंदु धर्माची अपकीर्ति करणारे अन् काल्पनिक प्रसंग दाखवण्यात आले आहेत.

3. 'कोणत्याही व्यक्तीने आर्यावर्तच्या नियमांच्या विरोधात कृती केल्यास त्याला भयंकर शिक्षा दिली जाते', असेही दाखवण्यात आले आहे.

4. विद्यार्थ्यांना लहानपणापासून प्रश्न विचारण्यास मनाई असून आर्यावर्तची संस्कृतीच महान आहे, असे बिंबबले जाते. शिक्षकांना प्रश्न विचारण्यापासून आणि बंदी असलेली पुस्तके वाचण्यापासून मनाई आहे, असे दाखवण्यात आले आहे. जे ऐकत नाही, त्यांना समाजाच्या झुंडीसमोर फेकण्यात येते आणि समाज तातडीने त्यांना शिक्षा देतो, असे दाखवण्यात येते.

5. यात अप्रत्यक्षित्यरित्या डॉ. जोशी यांची भूमिका ही मान. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्यासारखी दाखवून ते हुकूमशहा असल्याचे दाखवले आहे. भविष्यात ते कशाप्रकारे अन्य धर्मियांसमवेत वागतील, याचे भयावह चित्रीकरण दाखवण्यात आले आहे.

6. लहान मुलांना पुस्तकात लहानपणाच्या डॉ. जोशी यांचे कार्टून शिकवण्यात येते आणि डॉ. जोशी यांची प्रतिमा बलपूर्वक मुलांच्या मनावर बिंबवण्यात येते, असे दाखवण्यात आले आहे.

7. प्रत्येक प्रसंगात हिंदु धर्माचा मोठ्या प्रमाणात अवमान दाखवण्यात आला असून गरिब–श्रीमंत, शाकाहारी–मांसाहारी अशी विभागणी दाखवण्यात आली आहे.

8.	अशा प्रकारच्या चित्रपटाची अथवा नाटकाची निर्मिती झाली असती, तर त्याला परिनिरीक्षक मंडळाची मान्यता मिळाली नसती, तसेच प्रसिद्ध वाहिन्यांवर मालिकेची निर्मिती केल्यास त्याला हिंदूंचा प्रचंड विरोध झाला असता, हे लक्षात घेऊन निर्मात्यांकडून ज्याच्यावर सध्या कोणचेच नियंत्रण नाही, अशा 'नेटफ्लिक्स'च्या वेब सिरीजवर प्रसारण केले जात आहे.

**※ आम्ही मागणी करत आहोत की...**

1.	दीपा मेहता यांच्या 'नेटफ्लिक्स'वरील 'लैला' या 'वेब टेलीव्हिजन सिरीज' ही हिंदु धर्माविषयी खोटी, अतिरंजित, विकृत, अमानवी माहिती प्रस्तुत करून अन्य धर्मियांमध्ये दहशत-भय निर्माण करणारी, धार्मिक द्वेष पसरवणारी, दोन धर्मांत जातीय तेढ निर्माण करणारी, देशाची एकता, अखंडता आणि शांतता धोक्यात आणणारी, हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारी आहे. त्यातून भविष्यात देशातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात येऊ शकते. तरी देशाची एकता, अखंडता आणि शांतता कायम रहावी म्हणून 'लैला' या 'वेब टेलीव्हिजन सिरीज'वर विशेष बाब म्हणून तात्काळ बंदी घालावी. मालिकेद्वारे गुन्हा करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी !

2.	केंद्र सरकारने 'वेब टेलीव्हिजन सिरीज'च्या माध्यमातून देशाच्या संस्कृतीवर होणारे आघात रोखण्यासाठी एक कठोर नियमावली बनवावी आणि 'वेब टेलीव्हिजन सिरीज'साठी स्वतंत्र परिनिरीक्षण मंडळ बनवावे.

आपला विश्वासू,

संपर्क :